# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

STATE ELECTION COMMISSION
MAHARASHTRA

क्रमांक-रानिआ/रापानों-२०१६/प्र.क्र.१५/का.११
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक २० जून, २०२२

प्रति,
श्री.कोळप्पा हनुमंत धोत्रे,
अध्यक्ष : भारतीय वडार समाज संघर्ष पार्टी,
"ओम नम: शिवाय ",धोत्रे निवास, प्लॉट नं.३७,
गट नं.१९७,श्रमिक नगर,सातपूर, जि.नाशिक, पिन-४२२००७.

**विषय :- राजकीय पक्षाच्या नावातील बदलास मंजूरी देण्याबाबत...**
संदर्भ:-१. आपला दि.२७/४/२०२२ रोजीचा प्रस्ताव
२. आयोगाची निआ/रापनों२०१६/प्र.क्र.१५/का.११,दि.११/०५/२०२२ ची शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली अधिसूचना.

महोदय,

राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९ दि.३१ मार्च, २००९ भाग दोन (९) (दोन) मधील तरतुदीनुसार भारतीय वडार समाज संघर्ष पार्टी या पक्षाची नोंदणी आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.१५/का.११, दि.२५ जानेवारी,२०१७ अन्वये करण्यात आली होती. आपण पत्र दि.२७ एप्रिल,२०२२ अन्वये भारतीय वडार समाज संघर्ष पार्टी या पक्षाच्या नावात बदल करून त्या ऐवजी पक्षाचे नाव भारतीय लोकशक्ती पक्ष असे बदलून त्याची नोंदणी आयोगाकडे करण्याबाबत विनंती केली आहे. याअनुषंगाने पक्षाच्या नावात बदल करण्याबाबत राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९ दि.३१ मार्च, २००९ व दि.१५ फेब्रुवारी, २०२२ च्या आदेशांनुसार उक्त संदर्भ क्र.२ अन्वये अधिसूचना दि.११ मे,२०२२ रोजी प्रसिध्द करून पक्षाच्या नाव बदलाबाबत सर्वसाधारण जनतेकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या.

तथापि, विहित मुदतीत हरकती प्राप्त न झाल्याने, आयोगाच्या उक्त आदेशांतील भाग दोन ३.(१०) (अ) च्या सुधारित तरतुदीनुसार "भारतीय वडार समाज संघर्ष पार्टी" या पक्षाचे नावात "भारतीय लोकशक्ती पक्ष" असे बदल करण्यात राज्य निवडणूक आयोगाची मान्यता देण्यात येत आहे.

आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र.

प्रत:-१.विभागीय आयुक्त, सर्व विभागीय आयुक्तालय,
२.महानगरपालिका आयुक्त, सर्व महानगरपालिका कार्यालय,
३.जिल्हाधिकारी,सर्व जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४.मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषद कार्यालय,
५.मुख्याधिकारी,नगरपरिषदा/नगरपंचायती,सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती कार्यालय,
६.राज्य निवडणूक आयेगातील सर्व अधिकारी,
७.निवड नस्ती